3 - APR 2017
पुढारी
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# श्वेता परुळेकर, प्रियांका पाटील यांचा कुलगुरूंच्या हस्ते गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्य युवा पुरस्कारांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या एकाच वेळी दोन विद्यार्थिनींची निवड होणे, ही बाब अत्यंत अभिमानास्पद आणि कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने राज्य युवा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या श्वेता परूळेकर आणि प्रियांका पाटील या विद्यार्थिनींचा आज कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, युवकांच्या तुलनेत युवती कोठेही तसूभरही कमी नाहीत, हे या विद्यार्थिनींनी दाखवून देत युवा पुरस्कारांवर आपले नाव कोरले आहे. त्यांची ही कामगिरी विद्यापीठातील अन्य विद्यार्थिनींसाठीही आदर्शवत अशा प्रकारची आहे.

या वेळी कुलगुरूंच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांचा चरित्रग्रंथ भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी हंगामी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : राज्य युवा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या श्वेता परूळेकर आणि प्रियांका पाटील या विद्यार्थिनींचा सत्कार शनिवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. व्ही.एन. शिंदे आदी मान्यवर.**

13 - APR 2017 Times of India
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK students from botany department clear NET

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Four students from department of zoology of the Shivaji University, Kolhapur (SUK) qualified in the Council of Scientific and Industrial Research (CSIR) National Eligibility Test (NET), conducted earlier in the month of December last year.

Namrata Jadhav, Rutuja Behere, Rekha Shinde and Kajal Chaphekar cleared the NET exam. These students are pass outs from the department of zoology last year, an SUK circular said.

Vice-chancellor of SUK Devanand Shinde, congratulated the students on their achievements.

TOI



V-C Devanand Shinde with the state-level sports award winners

**Vice-chancellor felicitates state youth awardees:** The vice-chancellor of SUK, Devanand Shinde felicitated Shweta Parulekar and Priyanka Patil for their exemplary contribution in the field of sports. These girls were honoured at the state youth awards held recently.

Shinde said, "It is a proud moment for the university as two of our students have made to the state youth awards. Their achievement will inspire other girls in the region to contribute their bit towards sports and society. It proves that girls are no lesser than their counterparts."

In 2013, the state government had decided to confer

CAMPUS BUZZ

the youth awards to the candidates and organizations, which have done exceptional work in the field of sports and social work.

The candidates between the age group of 15 and 35 years can apply for the award. A district level committee comprising of five members and headed by the district collector evaluates the applications. The selected applicants are then passed on to the state level award committee comprising of six members and headed by the sports and youth welfare minister who evaluate the applications.

The interested applicants must apply only if they have minimum three years of experience in the field of sports, social service, environmental, cultural and educational purposes.

3 - APR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क अधिकारी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राणीशास्त्र अधिविभागातील चार विद्यार्थिनी नेट उत्तीर्ण

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदेंच्या हस्ते सत्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :-** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील चार विद्यार्थिनी एकाच वेळी लाइफ सायन्सेस या विषयात 'नेट' परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यातील दोघी 'गेट' परीक्षाही उत्तीर्ण झाल्या आहेत. तसेच दोघींनी ज्युनिअर रिसर्च फेलोशीपही प्राप्त केली आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थिनींचा ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

विद्यापीठांच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील चार विद्यर्थिनी सी. एस. आर. नेट, गेट, जे. आर. एफ. पात्र ठरल्या. नम्रता अ. जाधव (जे. आर. एफ. नेट, गेट), ऋतुजा पी. बेहरे (जे. आर. एफ.-नेट), रेखा ज. शिंदे (नेट- एल. एस. गेट) आणि काजल आर. चाफेकर (नेट- एल. एस.) अशी या विद्यार्थिनींची नावे आहेत. ही परीक्षा १८ डिसेंबर २०१६ रोजी घेण्यात आली होती. या सर्व विद्यार्थिनी अधिविभागातून २०१६ मध्ये एम.एस्सी. (प्राणीशास्त्र) उत्तीर्ण झाल्या आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी या विद्यार्थिनींना भावी संशोधकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. डी जाधव, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. ए. देशमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : लाईफ सायन्सेस विषयात नेट उत्तीर्ण विद्यार्थिनींसोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 - APR 2017

महाराष्ट्र टाईम्स

# 'प्राणीशास्त्र'च्या चार विद्यार्थिनी 'नेट' उत्तीर्ण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील चार विद्यार्थिनींनी एकाच वेळी 'लाइफ सायन्सेस' या विषयात 'नेट' परीक्षा उत्तीर्ण होण्याची कामगिरी केली. यापैकी दोघींनी 'गेट' परीक्षाही उत्तीर्ण केली आहे आणि दोघींनी ज्युनीअर रिसर्च फेलोशीपही प्राप्त केली आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थिनींचा ग्रंथभेट देऊन गौरव केला. डिसेंबर २०१६ मध्ये नेट आणि गेट परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षांना एम. एस्सी (प्राणीशास्त्र) विभागाच्या चार विद्यार्थ्यांनी या परीक्षांमध्ये यश मिळवले. नम्रता जाधव व रेखा शिंदे या नेट व गेट परीक्षा तर ऋतुजा बेहरे व काजल चापेकर यांनी नेट परीक्षेत यश मिळवले.

3 - APR 2017

पुढारी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरुंच्या हस्ते विद्यार्थिनींचा गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील चार विद्यार्थिनींनी एकाच वेळी 'लाईफ सायन्सेस' या विषयात नेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची चौफेर कामगिरी केली आहे. यातील दोघींनी गेट परीक्षाही उत्तीर्ण केली आहे आणि दोघींनी ज्युनिअर रिसर्च फेलोशीपही प्राप्त केली आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थिनींचा ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील चार विद्यार्थिनी सी.एस.आर. नेट/ गेट/ जे.आर.एफ. पात्र ठरल्या. नम्रता अ. जाधव (जे. आर. एफ. नेट, गेट), ऋतुजा पी. बेहरे (जे.आर.एफ. -नेट), रेखा ज. शिंदे (नेट- एल.एस. गेट) आणि काजल आर. चाफेकर (नेट- एल.एस.) अशी त्यांची नावे आहेत. ही परीक्षा दि. १८ डिसेंबर २०१६ रोजी देशभर घेण्यात आली. त्या सर्व विद्यार्थिनी अधिविभागातून २०१६ मध्ये एम.एस्सी. (प्राणीशास्त्र) उत्तीर्ण झाल्या आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी या विद्यार्थिनींना त्यांच्या भावी संशोधकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. डी जाधव, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. के.वाय. राजपुरे, डॉ. ए. ए. देशमुख उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 - APR 2017
पुण्यनगरी

# फेलोशिपच्या अंतिम सत्रासाठी जगन कराडे यांची निवड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे



हे असोसिएट फेलोशिपचे अंतिम सत्र पूर्ण करण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडी (आयआयएएस) या शिमला येथील प्रतिष्ठित संस्थेकडे रवाना झाले. आयआयएएसची फेलोशिप प्राप्त करण्याचा बहुमान शिवाजी विद्यापीठाला प्रथमच मिळालेला आहे. या प्रतिष्ठित फेलाशिपसाठी देशभरातून कार्यक्षम संशोधकांची निवड केली जाते. या फेलोशिपअंतर्गत शिमला येथे वर्षातून एक महिना असे तीन वर्षे वास्तव्य करून शोधनिबंध सादर करावा लागतो. डॉ. कराडे यांचे हे अंतिम वर्ष आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांसोबत चर्चा करण्याची संधी या फेलोशिपअंतर्गत संशोधकाला प्राप्त होत असते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 - APR 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात शिक्षकेतर प्रवर्गातून सिनेटरपदी रणजित शिंदे

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवर शिक्षकेतर प्रवर्गातून सिनेटरपदी रणजित शिंदे यांची निवड करण्यात आली. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्र रणजित शिंदे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, माजी संचालक बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक एम. व्ही. काकडे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 - APR 2017
तरुण भारत

# रणजित शिंदे यांची सिनेटवर निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सहायक अधीक्षक रणजित शिंदे यांची शिक्षकेत्तर प्रवर्गातून सिनेटवर निवड करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.



जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 - APR 2017

सकाळ

# फेलोशिपच्या अंतिम सत्रासाठी डॉ. जगन कराडे सिमल्यास रवाना



प्रा. जगन कराडे

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे असोसिएट फेलोशिपचे अंतिम सत्र पूर्ण करण्यासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स स्टडी या सिमला येथील संस्थेकडे रवाना झाले. आयआयएएसची फेलोशिप प्राप्त करण्याचा बहुमान विद्यापीठाला प्रथमच मिळालेला आहे. फेलोशिपसाठी देशभरातून संशोधकाची निवड केली जाते. या फेलोशिपअंतर्गत सिमला येथे वर्षातून एक महिना असे तीन वर्षे वास्तव्य करून शोधनिबंध सादर करावा लागतो.